# जिल्हा परिषद, नाशिकच्या समाजकल्याण विभागाचा सन २००७ – २००८ वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल

---

जा.क्र.स्था-३-ब जिप/स.क./नाशिक/१७५४

उपमुख्य लेखा परिक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखाकोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक.
दिनांक :- २१.५.२००९

प्रेषक :-

उपमुख्य लेखा परिक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक.

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद नाशिक.

समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नाशिक सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण श्री. सं. क. गायकवाड, निवडश्रेणी लिपीक स्थानिक निधी लेखा नाशिक यांनी दिनांक २०.१.२००९ ते ४.२.२००९ व श्री. वा. के. सिनकर, निवड श्रेणी लिपीक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ५.२.२००९ ते २७.२.२००९ या कालावधीत पूर्ण केले. या अहवालाचे पुर्नविलोकन श्री. उ. प्र. जोशी, जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी केले व श्री. विजय ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी अहवालावर चर्चा करुन अंतिमीकरण दिनांक १६.३.२००९ रोजी केले.

लेखापरिक्षण कालावधीत खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी या विभागाचे काम पाहात होते.

**अध्यक्ष:-**

| | |
|---|---|
| श्री. राधाकिसन सोनवणे | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**सभापती :-**

| | |
|---|---|
| श्री. पोपटराव बुधा अहिरे | १.४.२००७ ते २२.४.२००७ |
| पद नाही | २३.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**<u>मुख्य कार्यकारी अधिकारी</u>**

| | |
|---|---|
| श्री. ज्ञानेश्वर राजुरकर | १.४.२००७ ते ७.४.२००७ |
| श्री. दिपक चौधरी | ८.४.२००७ ते १८.५.२००७ |
| श्री. बी. जी. वाघ | १९.५.२००७ ते ३१.३.२००८ |

**<u>समाजकल्याण अधिकारी:-</u>**

| | |
|---|---|
| श्री. डी. ए. रक्षेकर | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखा परिक्षण )

मागील लेखा परिक्षण अहवालातील खालील परिच्छेद प्रलबिंत असून त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेशी स्वतंत्ररित्या पत्र व्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| १ | १९६२-६३ | १०४(२,३,४,५ ) | १ |
| २ | १९६६-६७ | ९३ | १ |
| ३ | १९६९-७० | १५३,१५८ | २ |
| ४ | १९७१-७२ | ६९,७१,७२,७३ | ४ |
| ५ | १९७३-७४ | ४१,४२,४४,५१ | ४ |
| ६ | १९७४-७५ | ५२,५६,५७<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.५७ :- (५.२४९) | ३ |
| ७ | १९७६-७७ | ५१<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.-५१: प्र.क्रं.५५६ दि.३१/३/९७ अन्वये रु.५६४२/- खर्च करण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहे. परंतू खर्च न झालेबाबत(५.१०४) | १ |
| ८ | १९७७-७८ | ६,८,९,१०,११,१२, | ६ |
| ९ | १९७८-७९ | ४,७,९,१०,१२,१७ | ६ |
| १० | १९७९-८० | ३(अ,ब),४,५,६,७(१ ते ३),८,९( अ,ब,क),१०(अ,ब,क),११,१३,१४, १५,१६,१७,१८,१९,२२,२५,२६,२७,२९,३१<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र. ११:- वसतीगृहास अनुदान दिले बाबत. (५.३८६)<br>परि.क्र.-१९:- १५ टक्के उपकारातून आदिवासी वसतीगृहात राहणा-या विद्यार्थ्याना रग व संतरज्या पुरविणे. (५.३८७)<br>परि.क्र.२५ :- परिचारीकेच्या प्रशिक्षणासाठी कपडे घडयाळ, बुट पुरविणेबाबत (५.३८८)<br>परि.क्र. ३१ :- वाढीव सेसमधील राबविल्या जाणा-या योजनांचे दप्तर उपलब्ध न होणेबाबत (५.४६५) | २२ |
| ११ | १९८०-८१ | ३,४,५,८,९,१०,११,१२,१३,१६,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८, २९,३०,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४१,४२,४३,<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.३:-पंचायत समिती मालेगांव अनियमितरित्या दिलेल्या अनुदानाबाबत (५.३१९) | ३४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परि.क्र.४:-पंचायत समिती इगतपुरी येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ऑईल इंजिन खरेदीसाठी अनुदान देणे बाबत (५.३२०)<br>परि.क्र.९ :- बालवाडी अनुदानातील अनियमितता (५.३२०)<br>परि.क्र.१६:- मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतीगृहास दिलेले अनुदानाबाबत (५.३२१) | |
| १२ | १९८१-८२ | ५,६(अ,ब),७,८,९(अ,ब),१०,११,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१.<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र.१५:- शेतीचा भागकरुन बैलगाडयासाठी अनुदान देण्यात आले (५.३१७)<br>परि.क्र.१७ :- खरेदी केलेली नसतांना बैलगाडी आणि बैलजोडीसाठी अनुदान देण्यात आले. (५.३१७) | २५ |
| १३ | १९८२-८३ | ३,४,५,६,८,९,११,१२,१३,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४(अ ते ई), २५,२६<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र.:१५ :- मागासवर्गीयांना शिलाई मशिन पुरविणे (५.२४०) | २१ |
| १४ | १९८३-८४ | ३,४(१ते४),५,७,९,१०,११,१२,१३,१४,१५(अ,ब),१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२४<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र.७:- कागदपत्रे लेखापरिक्षणात उपलब्ध केले नाहीत.(५.२८५अ)<br>परि क्र. १७:- मागासवर्गीयांचे शिलाई मशिन पुरविणे. (५.२२८) | १९ |
| १५ | १९८४-८५ | ५,६,१२,१३,१४,१६,१७,१८,१९,२१,२२,२३,२६,२७,२८<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२१: बैलजोडी, बैलगाडी अनुदान रोखीन देण्यात आले.(५.२५३) | १५ |
| १६ | १९८५-८६ | ६,७ (अ ब), ८(अ),९(अ),१२,१६,१०(अ ब),११ (अ,ब)<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.६ :- शिलाई मशिन खरेदी (५.२६९)<br>परि.क्र. ८:- (अ ब)(५.३७०) बैलगाडी, बैलजोडी. | ८ |
| १७ | १९८६-८७-८८ | ४,५,६,७,८,११(२)१२,१४,१५,१६,१७,१८,१९,२३,<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.७ :- बैलगाडी,बैलजोडी अनुदान वाटप (५.३४५)<br>परि.क्र.८ :- मागासवर्गीयांना शिलाई मशिन (५.३४६)<br>परि.क्र.१९:- कागदपत्रे उपलब्ध न करणे बाबत.(५.४१२(अ)) | १४ |
| १८ | १९८८-८९ | ३,४,५,६,७,९,१०,११,१२,१३,१४,१९<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.३ :- मागासवर्गीयांना, आदिवासींना कौले व ढापे पुरविणेबाबत. (५.३०८) | १३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परि.क्रं.८:- नैसर्गिक आपत्ती करता दिलेल्या अनुदानाबाबत.(५.३७९) | |
| १९ | १९८९-९० | ४,५,६,८,९,१०,११,१२,१४,२० | १० |
| २० | १९९०-९१ | ३,४,७,८,९,११,१२,१४,१५,१६,१९,२०,२१,२२,२३,२६,२७,३० | १८ |
| २१ | १९९१-९२ | ३(१),अ.क्र.१,२,३,४,५,६,७,८,३(२)४,६,७,८,९,१२,१४(२,३,४), १५,१६,२०,२१,२२,२४,२५,२६,२९,३०,३४ | १९ |
| २२ | १९९२-९३ | ३,४,५,८,९,१०,११,१२,१३,१४, १६,१९,२३,२४,२५,२७,२९,३०,३१,३४ | २० |
| २३ | १९९३-९४ | ३,४,५,७,८,९,१०,११,१६,२२,२३,२६,२९,३०,३१,३२,३३,३४, ३७ | १९ |
| २४ | १९९४-९५ | ३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१७,२०,२१,२३,२५,२६,२९,३०,३१, ३२,३३,३४,३५,२४(१,२)<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र. ४ :- कौले ढापे खरेदीतील अनियमितता (३.३५६)<br>परि. क्र. ५ :- लोखंडी पत्रे खरेदीतील अनियमितता (३.३५७) | २५ |
| २५ | १९९५-९६ | ३(१ ते ५),(६)१ते४६)(७), ५,६,८,९,१०,११,१६,१७,१८,१९,२०, २१,२३,२६,२८(१,३,)२९,३०,३२, | २० |
| २६ | १९९६-९७ | ३,६,७,८,९,१०,११,१३,(१) अ.क्र.१ व ३,१३(२)(३)१५,१६,१८,१९, २०,२१,२४,२६, | १६ |
| २७ | १९९७-९८ | ३,७,९,१०,११,१२,१३,१४,१६,१७,१९,२०,२२,२६,५(१,२,४,५,७,८) ४(१),१ ते ५ व ७ ते ९), ४ (३,४,७,८,)<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्रं.४:- मागासवर्गीयांना २०% मधुन इले.मोटार पुरविणे.(३.२४६)<br>परि.क्रं.१६:- वसतीगृहांना केलेले जादा अनुदान प्रदान.(३.२४७) | १६ |
| २८ | १९९८-९९ | ३,४(१ ते ३,५,६,७),८(१ ते ९ व ११ ते १३),५,६,७,१०,१२,१३,१४, १५,१६,१७,१८,१९,२४,२७<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र.३ :- अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जादा खर्च(३.३१६)<br>परि.क्र.४:- मागासवर्गीयांना ५एच.पी. ऑईल इंजिन पुरविणेबाबत(३.२४०)<br>परि.क्र १२:- मागासवर्गीयासाठी मंगलोरी कौले व ढापे खरेदीतील अनियमितता (३.२५१) | १७ |
| २९ | ९९-२००० | ३,४,५,६,७,८,१०,११,१२,१४,१६,१९,२३<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र.३ :- जि.प. उत्पन्नाची २० टक्के रक्कम मागासवर्गीयासाठी खर्च करणेबाबत.(३.३३७)(१४)<br>परि.क्र.४:- एच.पी.तेल यंत्र खरेदीतील अनियमितता.(३.२५४)<br>परि.क्र.१०:- मागासवर्गीयासाठी कौले व ढापे खरेदीतील अनियमितता.(३.२५५)<br>परि.क्र.११:- मागासवर्गीयासाठी लोखंडी पत्रे पुरविणे योजनेतील अनियमितता. (३.२५६) | १३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परि.क्र.१९:- कर्ज वसुलीबाबत.(३.३३७)(४) | |
| ३० | २०००-०१ | ४,९,१०,११,२१,<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र.४:- विदयुत पंप संच खरेदी व वाटपातील अनियमितता.(३.४३८)<br>परि.क्र.१० :- मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ५ एचपी ऑईल इंजिन पुरक साहित्यासह पुरविणेबाबत.(३.४३९) | ५ |
| ३१ | २००१-०२ | ४,५,६,७,८,९,११,१२,१३,१४,१५,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र.१३:- गोळशी जालखेड वाघाड निगडोळ रस्ता १०/५०० ते १३/०० मजबुतीकरण व डांबरीकरण (३.३७४)<br>परि.क्र.२०:- कर्ज वसुलीबाबत (३.३७५)<br>परि.क्र.२१:- दलित वस्ती योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीना रक्कमा वाटपाबाबत.(३.५२७)(८)<br>परि.क्र.२२:- ग्रामपंचायत रक्कमा प्राप्त झाले बाबत सामान्य पावत्या उपलब्ध करणेबाबत.(३.५२७)(८) | २२ |
| ३२ | २००२-०३ | ३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र.२५ :- दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना रक्कमा वाटप (३.३५८)<br>परि.क्र.२६:- कर्ज वसुलीबाबत. (३.४७५ (३)) | ३० |
| ३३ | २००३-०४ | ३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१७,१८,१९<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि क्र. ११ :- मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छपरे बदलून मंगलौरी कौले बसवणे. (३.४२७)<br>परि क्र. १३ :- कर्ज वसुलीबाबत. (३.५६८ (३)) | १६ |
| ३४ | २००४-०५ | ३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि क्र. ५:- ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना मळणी यंत्र पुरविणे(३.४५५)<br>परि क्र. २२ :- कर्ज वसुलीबाबत. (३.५६०(३)) | २५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | २००५-०६ | ३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३<br>पंचायत राज समिती लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र. ५ :- ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना पी.व्ही.सी. पाईप पुरविणे.(३.१०५१)<br>परि. क्र. ९ :- ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना ब्रॉस बॅण्ड साहित्य पुरविणे. (३.१०५२)<br>परि. क्र. ११ :- घरबांधणीसाठी अर्थसहाय्य पुरविणे.(३.१०५३)<br>परि. क्र. १३ :- दलितवस्ती सुधारणा योजना खर्चाबाबत.(३.१०५४)<br>परि. क्र. १५ :- किकवारी बु, ता.बागलाण येथे समाजमंदीर बांधकाम करणेबाबत. (३.१०५५)<br>परि. क्र. २२:- कर्ज वसूलीबाबत.(३.१३८०(१०)) | |

| **सन २००६ – २००७** |
|---|
| परिच्छेद क्रमांक ३:- मागासवर्गीयाचे कल्याणार्थ करावयाचा खर्चाचा अनुशेषाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ४:- २०% निधितुन मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता योजनेची प्रभावी अंमलबजावणी पध्दतीबाबत व वेळापत्रकाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ५:- मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरबांधणीसाठी अर्थसहाय्य देण्याच्या योजनेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ६:- मागासवर्गीय लाभार्थ्यांना सौरकंदील पुरविणेच्या योजनेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ७:- इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणा-या मुला मुलींना सायकल पुरविणे |
| परिच्छेद क्रमांक १०:- गवती छप्पर बदलुन लोखंडी पत्रे पुरविणेच्या योजनेस पूरक अनुदान देणेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ११:- सुधारित प्राप्त तरतुदीपेक्षा कमी / जास्त खर्चाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १२:- दलित वस्ती सुधारणा योजनेवरील खर्चाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १३:- दलित वस्ती सुधारणा अनुदान वाटपाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १४:- दलित वस्ती सुधार योजना ग्रामपंचायतींना अनुदान वाटपांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १५:- दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींना प्रदान केलेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १६:- दलीत वस्ती योजना कांमाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १७ :- कर्ज वसूलीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १८:- कमी मुद्रांक शुल्क आकारणीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १९:- आदिवासी छात्रालय कळवाडी ता.मालेगांव वसतीगृह अनुदान निर्धारणाबाबत |
| परिच्छेद क्रमांक २०:- लोकनेते व्यंकटराव हिरे विद्यार्थी वसतिगृह कळवाडी ता. मालेगांव ४०% अनुदान हप्ता प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २१:- के.बी.एच.हिरे विद्यार्थी वसतिगृह, निमगांव ता. मालेगांव अनुदान निर्धारणाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २२:- जनता विद्यार्थी वसतिगृह अभोणा ता.कळवण अनुदान निर्धारणाबाबत. |

| | |
|---|---|
| परिच्छेद क्रमांक २३:- | गौतम छात्रालय (वसतिगृह) खोकरतळे, ता. पेठ यांना प्रदान केलेल्या ४०% अनुदान हप्त्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २४:- | वृध्द कलाकारांना मानधन प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २५:- | वृध्द कलाकारांना मानधन वाटपाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २६:- | वृध्द कलाकारांना मानधन प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २७:- | मॅट्रीकपूर्व / मॅर्टीकोत्तर शिक्षण घेणा-या अपंग विद्यार्थ्यांच्या व इतर विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २८:- | भविष्य निर्वाह निधी खाते ची सुरुवातीची शिल्लक कमी घेतलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २९:- | सेवा पुस्तकात रजेच्या नोंदी नमूद न करणेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३०:- | लेखा स्थिती |
| परिच्छेद क्रमांक ३१ :- | विवरण पत्रे |
| परिच्छेद क्रमांक ३२ :- | आक्षेप विवरणपत्र |
| परिच्छेद क्रमांक ३३ :- | अनुपालन व पोहच |

टिप :- उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपाच्या संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायांमध्ये नमुद करण्यात आलेले परिच्छेद क्रमांकच अंतिम समजण्यात यावेत.

# भाग दुसरा
# (चालु लेखापरीक्षण )

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खालील अनियमितता.

### परिच्छेद क्रमांक १ :- मागासवर्गीयाचे कल्याणार्थ करावयाचा खर्चाचा अनुशेषाबाबत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १००(६) अन्वये जिल्हा परिषद उत्पादनातुन मागासवर्गीयाचे कल्याणार्थ खर्च करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/१०९३/सीआर/१२६५/३४ दिनांक ९.१२.१९९३ व शासन निर्णय क्रमांक मागास १०९८/प्र.क्र.७३/७४ दिनांक २०.१०.१९९९ अन्वये मागासवर्गीयांचे कल्याणार्थ जिल्हा परिषदेच्या महसुली उत्पन्नांचे रक्कमपैकी २०% रक्कम खर्च करणे आवश्यक असुन एखाद्या वर्षात जर २०%पेक्षा कमी खर्च केला असेल तर सदर खर्चाचा अनुशेष पुढील वित्तीय वर्षात भरुन काढणे आवश्यक आहे. तथापी खालीलप्रमाणे मागासवर्गीयासाठी कमी खर्च केल्याचे आढळून आले.

(आकडे रुपयांत)

| वर्ष | जि.प. महसुली उत्पन्न | २०% प्रमाणे खर्च करावयाची | मागिल अनुशेष | एकुण करावयाची खर्च | प्रत्यक्षात खर्च केलेली | प्रत्यक्ष केलेला खर्च | कमी केलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ - ०८ | १५६८२९८७८ | ३१३६५९७५ | ९६४९११४ | ४१०१५०८९ | १४८००००० | १३२६३९३ | २७७५११५१ |

सन २००७ – २००८ मध्ये २०% सेस मधील मागासवर्गीयांचे कल्याणार्थ केलेला खर्च विवरणपत्र १ मध्ये सोबत जोडला असुन त्यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे...

मागासवर्गीयांचे कल्याणार्थ करावयाच्या खर्चाचा अनुशेष दरवर्षी वाढत असुन याबाबत मागिल लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक ३ नोंदविलेला आहे. तथापी मागासवर्गीयांचे कल्याणार्थ करावयाचा खर्चाचे अनुशेष भरुन काढण्याबाबत कार्यवाही जिल्हा परिषदेने केलेली नाही. त्यामुळे वरील नियमाप्रमाणे मागासवर्गीयांना मिळणा-या लाभापासुन वंचित ठेवले गेले आहे. या अनियमिततेस शासनाचे क्षमापन घ्यावे. तसेच मागासवर्गीयांचे कल्याणार्थ करावयाचे खर्चाचा अनुशेष भरुन काढून अनुपालन दाखवावे.

### परिच्छेद क्रमांक २ :- २०% निधितुन मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता योजनेची प्रभावी अंमलबजावणी पध्दतीबाबत व वेळापत्रकाबाबत.

समाजकल्याण विभागाकडून सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात खालीलप्रमाणे तपशिलात नमुद केलेप्रमाणे विविध प्रकारच्या योजना राबविण्यात आल्या आहेत.

१. ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना वाहनचालक प्रशिक्षण देणे.
२. ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरबांधणीसाठी अर्थसहाय्य पुरविणे.
३. ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना ब्रास बँड साहित्य पुरविणे.
४. ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिला लाभार्थ्यांना शेवया मशिन पुरविणे.
५. ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिला लाभार्थ्यांना पापड मशिन पुरविणे.
६. ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिला लाभार्थ्यांना पिको फॉल मशिन पुरविणे.
७. ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिला भजनी साहित्य संच पुरविणे.
८. मागासवर्गीय लाभार्थ्यांना सौर उर्जा कंदील पुरविणे.
९. मागासवर्गीय अपंग लाभार्थ्यांना टपरी पुरविणे.
१०. मागासवर्गीय लाभार्थ्यांना ऑईल इंजिन / इलेक्ट्रिक मोटार पुरविणे.
११. मुलींच्या अनुदानीत वस्तिगृहांना सोलर हिटर पुरविणे.
१२. अनुदानीत वस्तिगृहांना चादर / सतरंजी / ब्लँकेट पुरविणे
१३. इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणा-या मुला / मुलींना सायकल पुरविणे.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए/ २०००/प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार जिल्हा परिषदांनी योजना राबवितांना पाळायचे वेळापत्रक निश्चित केले आहे. त्यानुसार लाभार्थी निवड ३० सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत करणे आवश्यक आहे. तद्नंतर, निविदा मागवून खरेदी प्रक्रियेसह वाटप दिनांक ३१.३.२००७ अखेर पूर्ण होणे आवश्यक आहे. मात्र बहुतांशी साहित्य लाभार्थ्यांना दिनांक ३१.३.२००७ नंतर वाटप केल्याचे पंचायत समिती स्तरावरील वाटप नोंदवहीवरुन स्पष्ट होते.

शासकीय योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वार्षिक आखणी ठरवुन दिलेल्या वेळा पत्रकानुसार कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे यास शासनाचे क्षमापन प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे. यापुढे शासन निर्णयातील वेळापत्रकानुसार विहीत अंमलबजावणी होईल याची पुरेपूर दक्षता घ्यावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ३ :- मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरबांधणीसाठी अर्थसहाय्य देण्याच्या योजनेबाबत.</u>**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजुरी | मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नाशिक यांचेकडील आदेश क्र.जिपना/सक-४/७०१/०७ दिनांक ४.१०.०७ |
| तांत्रिक मंजुरी | मा.संचालक, समाज कल्याण, पुणे यांचे आदेश क्र. सकवि/ तामा/ २०%/ नाशिक ९९/००/का-१२/११३२ दिनांक २८.११.२००० |
| खर्चाचा तपशिल | योजनेवरील एकुण खर्च रुपये ४१,३२,५००/-<br>उपलब्ध तरतूद रुपये ४१,५०,०००/- |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

१) प्रति घरकुलाची किंमत रुपये ३०,०००/- असून रुपये २८,५००/- प्रति घरकुलाचे अनुदान विभागाने लाभार्थ्यास दिले असून लाभार्थ्यांने रुपये १,५००/- रोखीने अथवा श्रमदान स्वरुपात खर्च करावयाचे आहेत. मात्र अनुदान इंदिरा आवास घरकुल योजनेप्रमाणे घरकुलाची प्रगती पाहून देण्याची अट विहित केली आहे. त्यानुसार रुपये ३,०००/-, रुपये ५,०००/-, रुपये १०,०००/- रुपये ४,०००/- व अंतिम हप्ता रुपये ६,५००/- शौचालय बांधणीनंतर अनुदान देय आहे. मात्र गटांनी तशी कार्यवाही केलेली नाही. शौचालय बांधकाम केल्याबाबतचे तांत्रिक विभागाचे प्रमाणपत्र न देताच गटांनी पूर्ण रक्कम प्रदान करुन अनियमितता केलेली आहे. या अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित व्हावी.

२) योजनेकरीता विभागाने जिपना/सक-४/२०% सेस घरकुल/२००२/०६ दि.२१.१२.२००६ (४१), जिपना/सक-४/२०% सेस घरकुल/१०२/०७ दिनांक ९.२.०७ (७३) व जिपना/सक-४/ २०% सेस घरकुल/१९४/०७ दिनांक २१.३.२००० (८) अशी १२२ लाभार्थ्यांची निवड केली असून अटी शर्तीनुसार, सदरची रक्कम दिनाुक ३१.३.२००८ पर्यंतच खर्च करणे बंधनकारक केले आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही.

त्याबाबतचा उदाहरणादाखल तपशील खालीलप्रमाणे आहे :

अ) त्र्यंबकेश्वर गटाकडील खालील तपशिलानुसार लाभार्थ्यांना रक्कमा प्रदान केलेल्या आहेत.

| अ.क्र. | लाभार्थ्याचे नाव | राहणार | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | श्री. काळु सोमा अंबापूरे | दहिने | १८,००० |
| २ | श्री. किसन शिवराम वाघ | सामुडी | १२,००० |
| ३ | श्री. गणेश वसंत भोये | ठाणपाडा | १८,००० |
| ४ | श्री. कृष्णा नारायण बेंडकोळी | शिवाजीनगर | १८,००० |
| ५ | श्री. सुखदेव खंडू बेंडकोळी | होलदारनगर | २२,००० |
| ६ | श्रीमती सिंधूबाई रामदास बेंडकोळी | होलदारनगर | २२,००० |
| ७ | श्री. नामदेव वामन बेंडकोळी | शिवाजीनगर | २२,००० |

ब) नाशिक गटाकडील श्री. देवराम गोविंदा उबाळे, रा. महादेवपूर यांना रुपये २८,५००/- अनुदान मंजूर असून दिनांक ३१.३.२००८ अखेर त्यापैकी रुपये २२,०००/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेल आहे.

क) गटांकडील मंजूर लाभार्थी संख्या व दिनांक ३१.३.२००८ अखेर अपूर्ण बांधकाम घरकूलांची संस्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गटाचे नांव | मंजूर घरकुल संख्या | अपूर्ण कामांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | मालेगांव | १० | ७ |
| २ | येवला | ११ | ६ |
| ३ | देवळा | ०९ | ७ |
| ४ | बागलाण | - | ४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | निफाड | ११ | ७ |
| ६ | सुरगाणा | १० | ४ |
| ७ | दिंडोरी | ०९ | ४ |
| ८ | नांदगांव | १० | ५ |
| ९ | सिन्नर | ०९ | ६ |
| १० | नाशिक | १० | ५ |
| ११ | चांदवड | १० | १ |
| १२ | त्र्यंबक | ०९ | ३ |
| १३ | इगतपुरी | ०९ | ७ |
| | | ११७ | ६६ |

यावरुन ज्या उद्देशाने आर्थिकदृष्टया कमकुवत घटकाचे लाभार्थ्यांसाठी योजना राबविण्यात आली, त्याबाबतचा उद्देश सफल झालेला नाही. दिनांक ३१.३.२००८ अखेर काम पूर्ण करणेबाबत अटी-शर्ती, तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन नि.क्र.मागास/१०९८/प्र.क्र.७३/३४ दिनांक २०.१०.१९९९ परि.क्र.७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे याजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केलेल्या वार्षिक आराखडयानुसार कार्यवाही झालेली नाही.

उपरोक्त उणीवांबाबत समाजकल्याण समितीचे क्षमापन घेणे आवश्यक आहे. उपरोक्त अनियमिततांची पुर्तता होईपर्यंत सदरचा खर्च रुपये ४१,३२,५००/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रुपये ४१,३२,५००/-
जि.प.सेस

(विवरणपत्र क्र. ८ चा अ.क्र.१ पहा)

---

## स्थानिक क्षेत्र

## मुबंई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खालील अनियमितता.

---

### परिच्छेद क्रमांक ४ :- ३% वन अनुदानातून सन २००७ – २००८ या वर्षात ग्रामपंचायत सौर पथदिपांचा पुरवठा करणे.

सन २००७ – २००८ या आर्थिक वर्षात १३ वने ७% वन महसूल अनुदानातून वन विभागातील ग्रामपंचायत हद्दी लगतच्या रस्त्यांवर सौर पथदिप पुरविणे (१००% अनुदान)

या योजनेस समाजकल्याण समिती सभा दिनांक १०.७.२००७ मधील ठराव क्रमांक २४ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच जिल्हा परिषदेने सर्वसाधरण सभा दिनांक २५.३.२००८ अन्वये रुपये ७,४९,२५०/- एवढ्या तरतुदीस व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. सदरच्या मान्यतेतील अट क्र.७ नुसार वनविभागाने निश्चित केलेल्या यादीनुसार १ ग्रामपंचायतीस रु. २४,९७५/- एवढ्या रक्कमेचा लाभ देय आहे.

वरील पथदिप खरेदी ही जैन इरिगेशन प्रायव्हेट लि. जळगाव यांचेकडून प्रति नगास रुपये २४,९७५/- प्रमाणे ३० नग खरेदी करुन प्रमाणक क्र. ११३१ दिनांक २३.३.२००८ अन्वये रक्कम रुपये ७,४९,२५०/- एवढा खर्च नोंदविण्यात आलेला आहे. पुरवठादाराने खालील ग्रामपंचायतींना पथदिपाचा पुरवठा केलेला आहे.

| अ.क्र. | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव |
|---|---|---|
| १ | येवला | कुसुमाडी |
| २ | मालेगाव | डोंगराळे |
| ३ | बागलाण | गोळवाड |
| | | टेंभे वरचे |
| ४ | सिन्नर | नळवाडी |
| ५ | देवळा | कुंभार्डे |
| | | काचणे |
| ६ | निफाड | बोकडदरा |
| | | सावरगाव |
| ७ | चांदवड | इंदिरानगर |
| | | दहयाणे |
| ८ | नाशिक | वेल्होळी |
| | | दहेगाव |
| ९ | त्र्यंबक | चंद्राची मेट |
| | | गोलदरी |
| १० | पेठ | नानशेत |
| ११ | इगतपुरी | अधरवड |
| १२ | दिंडोरी | टेडमाळ |
| | | गोहोळे |
| १३ | नांदगाव | चांदोरी |
| | | जातेगाव |
| १४ | कळवण | बिजोरे |
| | | वंजारी |
| १५ | पेठ | गारमाळ |
| १६ | मालेगाव | वनपट |

| | | |
|---|---|---|
| १७ | इगतपुरी | त्रिंगलवाडी |
| १८ | सुरगाणा | मोहाळपाडा |
| १९ | सिन्नर | दापुर |
| २० | येवला | राजापुर |
| | **एकूण** | **३० ग्रामपंचायती** |

यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) केंद्र शासनाकडून सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षामध्ये सौर पथदिपासाठी रुपये ९,६००/- अनुदान वितरीत करण्यासाठी खालील दोन संस्था प्रमाणित केल्या आहेत:

I. मा. महाव्यवस्थापक (ग्रामीण वर्ग), महाउर्जा, पुणे

II. मा. व्यवस्थापक, पश्चिम घाट

महाउर्जाकडील पत्र क्र. आर/इ/एन/सोलर/२००७–२००८/१२०२ दि.३०.३.०८ अन्वये अनुदान रुपये ९,६००/- जाहिर करण्यात आलेले आहे.

जिल्हा परिषद कृषी विभागाकडून मा. व्यवस्थापक (ग्रामीण उर्जा), महाउर्जा, पुणे यांचेकडे जा.क्र.उर्जा/४/२००८ दिनांक २०.१०.२००८ अन्वये एकूण ३० सौर दिपाचे प्रति रुपये ९,६००/- प्रमाणे रुपये २,८८,०००/- एवढे अनुदान प्राप्त होणेसाठी प्रस्ताव दोन्हीही विभागांसाठी एकत्रित पाठविण्यात आलेला होतो. त्यापैकी पश्चिम घाट विकास अंतर्गत १५ सौरदिपाचे अनुदान जिल्हा परिषदेस रुपये १३,४००/- एवढे प्राप्त झाले आहे.

मा. महाव्यवस्थापक (ग्रामीण उर्जा), महाउर्जा, पुणे यांचेकडून रुपये १,५३,६००/- एवढे अनुदान कोणत्या कारणांमुळे अप्राप्त राहिले याबाबत त्यांचेशी पत्रव्यवहार व्हावा. जिल्हा परिषदेच्या प्रशासनाकडून झालेल्या त्रुटी अथवा दिरंगाईमुळे अनुदान प्राप्त होत नसल्यास याबाबत संबंधित सक्षम अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित व्हावी. उचित कार्यवाहीअंती अनुदान प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

१४ समाजकल्याण

अनुदान अप्राप्त करावयाची रक्कम रुपये १,५३,६००/-

(पहा विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. २)

---

**<u>परिच्छेद क्रमांक ५ :- अपंगासाठी स्वयंरोजगारांकरीता टपरी पुरविणे</u>**

| | |
|---|---|
| योजनेचे नाव | ३% महसूल अनुदानातून अपंग व्यक्तिंना टपरी पुरविणे |
| प्रशासकीय मान्यता (सुधारीत) | जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १४ दिनांक २५.३.०८ अन्वये रु. ५,४६,०००/- |

| | |
|---|---|
| तांत्रिक मान्यता | अतिरिक्त मु.का.अ.जि.प.नासिक रुपये २,००,०००/- एवढया रकमेस देण्यात आलेली आहे. |
| पुरवठा दार | वर्षा ट्रेडिंग कंपनी राहुरी ता. अहमदनगर |
| पुरवठा आदेश | जि.प.स.क./४/अपंग/०८ दि. २.३.२००८ एकूण १२ नग पुरवठा करण्याचे आदेश |
| खर्च | प्र.क्रं. ८३५ दिनांक ३१.३.०८ रु. ५,४६,०००/- |

जि.प. ने २० टक्के जिल्हा निधीतून नियमित मागासवर्गीयांसाठी टपरी (लोखंडी) वर्षा ट्रेडींग कंपनी, अहमदनगर यांचे मंजूर दर प्रति टपरी रु. १५,६००/- प्रमाणे निविदा स्विकृत समितीने मान्य केलेली असल्याने त्यांचे कडुन खरेदी करण्यात आलेली आहे.

सर्वसाधारण सभा ठराव क्रं. १४ दि. २५.३.२००८ अन्वये रु. ३,४६,०००/- तरतूद वाढवून ती एकंदर ५,४६,०००/- मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार नविन २३ नविन अपंग लाभार्थ्यांसाठी टपरी खरेदी करण्यात आलेली आहे.

या संदर्भात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) खरेदी पूर्वी लाभार्थ्यांची निवड यादी तयार करण्यात आलेली नाही.

२) योजना राबविण्यापूर्वी योजनेस प्रसिध्दीस देवून गरजू लाभार्थ्यांकडून प्रस्ताव प्राप्त करुन त्याप्रमाणे निवड करुन मागणी नोंदविणे आवश्यक होते. मार्च अखेरीस सुधारीत तरतूद करुन केवळ जिल्हा-निधीतील रक्कम खर्च करण्याचा उद्देश डोळयासमोर ठेवून केलेली कृति नियम बाहय आहे.

३) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक भारवस/१०९३/उद्योग-६ दिनांक १६ जुलै १९९३ नुसार खरेदी रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असल्याने शासन राजपत्रात प्रसिध्दी देवून जाहीर निविदा मागविणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही न केल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही. या अनियमितेस मा. संचालक, समाजकल्याण विभाग, पुणे यांचे क्षमापन घ्यावे.

४) तांत्रिक मान्यता रु. २,००,०००/- एवढया मर्यादित रकमेस आहे. रु. ३,४६,०००/- जादा खर्चास तांत्रिक मान्यता घेतली नसल्याच्या अनियमिततेस सर्वसाधारण सभेचे क्षमापन घ्यावे.

५) लाभार्थी कोणता व्यवसाय करणार आहेत. याबाबत कोणतेही दस्तऐवज उपलब्ध झाले नाही.

६) लाभार्थ्यांनी व्यवसाय परवाना नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत घेण्यात आलेले नाहीत.

७) गटविकास अधिकारी / समाजकल्याण अधिकारी यांचे विनियोग दाखले आणि व्यवसाय सुरु असलेबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे परवाने व कर वसूली पावत्यांच्या प्रथम वर्षाच्या प्रती दर्शवाव्यात.

उपरोक्त अभिप्रायांचे पुर्ततेअभावी खर्च रुपये ३,९०,०००/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

१४ समाजकल्याण

३% महसूल अनुदान

जिल्हा परिषद खर्च

आक्षेपाधिन रक्कम रुपये ५,४६,०००/-

(पहा विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ३)

---

**परिच्छेद क्रमांक ६ :- अपंगांच्या बचत गटास अनुदान देणे**

सन २००७ – २००८ या आर्थिक वर्षीसाठी जिल्हा परिषद ३% सेस अनुदानातून अपंग लाभार्थ्यींच्या बचत गटांना आर्थिक सहाय्य पुरविणे या योजनेकरीता रक्कम रुपये ३.९० लक्ष तरतुदीसह जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. २ दिनांक १३.४.२००७ अन्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. तांत्रिक मान्यता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिनांक ७.१.२००८ अन्वये दिलेली आहे. एका गटास रुपये २६,०००/- प्रमाणे १५ गटांना रुपये ३,९०,०००/- एवढे अनुदान हे प्रमाणक क्रमांक ८३४ दिनांक ३१.३.२००८ अन्वये संबंधित गटास प्रदान करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | बचतगटाचे नाव | तालुका | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | शिवमल्हार अपंग स्वयंसहाय्यता घोटी | इगतपुरी | २६,००० |
| २ | साथी अपंग गट दिंडोरी | दिंडोरी | २६,००० |
| ३ | बाणेश्वर अपंग स्वयंसहाय्यता गट जलालपुर | नाशिक | २६,००० |
| ४ | महात्मा फुले अपंग स्वयंसहाय्यता गट | नाशिक | २६,००० |
| ५ | महादेव अपंग स्वयंसहाय्यता गट | लखमापुर | २६,००० |
| ६ | संत जर्नादन स्वामी अपंग स्वयंसहाय्यता गट | वाघेरा | २६,००० |
| ७ | जयशिवाजी अपंग स्वयंसहाय्यता गट | उमराणे | २६,००० |
| ८ | बाणगंगा अपंग स्वयंसहाय्यता गट | ओझरमिग | २६,००० |
| ९ | स्वामी समर्थ अपंग स्वयंसहाय्यता गट | पळाशी | २६,००० |
| १० | प्रगती अपंग स्वयंसहाय्यता गट | साकोरा | २६,००० |
| ११ | श्री गणेश अपंग स्वयंसहाय्यता गट | वडाळीभोई | २६,००० |
| १२ | सिन्नर तालुका अपंग स्वयंसहाय्यता गट | सिन्नर | २६,००० |
| १३ | छत्रपती शिवाजी अपंग स्वयंसहाय्यता गट | सोयगाव | २६,००० |
| १४ | साईराम अपंग स्वयंसहाय्यता गट | वडेल | २६,००० |
| १५ | सदगुरु जनार्दन स्वामी अपंग स्वयंसहाय्यता गट | सोयगाव | २६,००० |
| | | **एकूण** | **३,९०,०००** |

या संदर्भात खालील अभिप्राय देण्यांत येत आहेत:

१) महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक ए.बा.वि./२००४/प्र.क्र.२३३/का-५ मुंबई ३८ दिनांक २८.१०.२००५ मधील अट क्रमांक ७ नुसार बचत गट हे सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० किंवा कंपनी अधिनियम १६५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणी झालेबाबत आवश्यक नोंदणीपत्रासह आवश्यक ते दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

२)    ज्या प्रयोजनासाठी अनुदान संबंधित बचतगटांना वितरीत करण्यात आले आहे. त्यांनी केलेल्या विनियोग व फलश्रुतीबाबत संबंधित सक्षम अधिकारी यांचे अहवालांसह अनुपालन दर्शवावे.

तोपर्यंत सदरचा खर्च रुपये ३,९०,०००/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

१४ समाजकल्याण
३% अनुदान तरतुद
आक्षेपाधिन रक्कम रुपये ३,९०,०००/-

(पहा विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ४)

---

**परिच्छेद क्रमांक ७ :- वन संरक्षण / व्यवस्थापन समितीस उत्तेजनार्थ बक्षिस देणे.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | समाजकल्याण समिती सभा दिनांक १०.७.२००७ विषय क्रमांक ५ |
| उद्देश | वन व्यवस्थापन कार्यक्रम उत्कृष्ठ कार्य करणा-या १५ तालुक्यातील प्रत्येकी ३ व्यवस्थापन समित्यांना रुपये ५,०००/- प्रमाणे ४५ ग्रामपंचायतींना रुपये २,२५,०००/- व द्वितीय वनसंरक्षण समित्यांना रुपये ३,०००/- प्रमाणे प्रत्येकी ४५ ग्रामपंचायतींना रुपये १३,५००/- असा एकूण खर्च रुपये ३,६०,०००/- हा प्र.क्र. ६७८८ दिनांक १८.३.२००८ अन्वये नोंदविण्यात आलेला आहे. |
| संदर्भ | उपवनसंरक्षक, पश्चिम भाग, नाशिक यांचे पत्र क्र. जा.क्र. कक्ष-१/योजना/६२४१/०७-०८ दि. १३.३.२००८ अन्वये तालुकानिहाय प्रथम १ ते ३ व द्वितीय १ ते ३ तृतीय वनसंरक्षण समित्यांबाबत वरील प्राप्त यादीनुसार एकूण ९० ग्रामपंचायतींना रुपये ३,६०,०००/- एवढा खर्च करणेबाबत आदेशानुसार वाटप करण्यात आले आहे. |

यासंदर्भात खाली अभिप्राय देण्यात येत आहेतः

१)    ग्रामीण वनसंरक्षण / व्यवस्थापन समिती स्थापन केलेबाबत व सदरच्या समितीस कोणी व कोणत्या प्राधिकारान्वये मंजूरी दिली याबाबत आवश्यक ते दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

२)    लाभप्राप्त ग्रामपंचायतींच्या व्यवस्थापन समितीने अनुदानाचा उपयोग कोणत्या प्रयोजनासाठी करावयाचा याबाबत अनुदान वाटप अटीत तपशिल नाहीत. त्यामुळे विनियोग उचित झाल्याची खात्री नाही.

३)    उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे. तोपर्यंत रक्कम रुपये ३,६०,०००/- तात्पुरता अमान्य करण्यात येत आहे.

१३ वन अनुदान
७% वन महसुल अनुदान
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ३,६०,०००/-

(पहा विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ.क्र. १)

## परिच्छेद क्रमांक ८ :- प्राथमिक शाळांना लेखन सामुग्री पुरविणे

| | |
|---|---|
| योजना | १३ वने अंतर्गत ७% वन महसुल अनुदानातून वनविभागातील जंगल विभागातील खेड्यांच्या प्राथमिक शाळांना लेखन सामुग्री पुरविणे |
| योजनेस मंजुरी | समाजकल्याण समिती सभा दिनांक १०.७.२००७ ठराव क्रमांक २४ |
| तरतुद | समाजकल्याण समिती ठराव क्र. ७४ दि.१३.८.२००७ अन्वये रुपये २ लाख |
| तांत्रिक मान्यता | जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक/जिपना/स.क./दवसु/६/२००७ दिनांक ३.१.२००८ |

लेखन सामुग्री खरेदीबाबत दिनांक १६.३.२००८ रोजी दैनिक देशदुत या जिल्हा स्तरीय वर्तमानपत्रात जहीर निविदा प्रसिध्दीस देण्यात आलेली आहे. त्यानुसार खालील ३ निविदा धारकांनी निविदा भरुन सादर केल्या आहेत.

१. सुविधा बुक एजन्सीज २२% कमी दराने
२. शारदा एज्युकेशन चार्टस पुणे १७% कमी दराने
३. अभिषेक टाईपराईटर्स, पुणे १५% कमी दराने

सुविधा बुक एजन्सी यांची २२% कमी दराची निदिा किमान दराची असलयाने त्यांना वाटाघाटीस बोलावून त्यांनी २३% कमी सूटीची टक्केवारी मान्य केल्याने त्यांना पत्र क्रमांक ४७८ दिनांक १६.३.२००८ अन्वये मालाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. पुरवठादाराने एकूण ५० संचाचा पुरवठा तालुका स्तरावर पोहोच केलेला आहे. मे. सुविधा बुक एजन्सीज्, पुणे यांना प्रमाणक क्रमांक ७१४ दिनांक ३१.३.२००८ अन्वये निव्वळ रक्कम रुपये २,४९,७८८/- खर्च नोंदविलेला आहे.

या संदर्भात खालील अभिप्राय देण्यांत येत आहेत:

१) तांत्रिक मान्यता देतांना खालील बाबींचे पालन केलेले नाही.

अ) संबंधित मान्यता प्राप्त शाळा ही वनविभागाने निधीत केलेल्या यादीमधील जंगलक्षेत्रातील असावी. मात्र या बाबतीत वन विभागाकडील जंगल क्षेत्रातील यादी नस्तीसोबत नाही.

ब) संबंधित शाळेने यापूर्वी लाभ घेतलेला नसलेबाबत सक्षम अधिकारी यांचा दाखला जोडण्यात आलेला नाही.

क) पुस्तकांचे रेकॉर्ड व योग्य ती निगा ग्रंथालयाप्रमाणे संबंधित शाळेने करावी असे नमुद असतांना सर्व पुस्तके ही गटशिक्षणाधिकारी यांना प्राप्त झाल्याच्या पोहोच आहेत. त्यामुळे थेट शाळांना सदरच्या पुस्तकांचे वाटप नाही. यावरुन विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ थेट व वेळीच झालेला नाही, हे स्पष्ट आहे.

ड) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांनी वनविभागातील प्राथमिक शाळांना शाळानिहाय वाटप केल्याची पुर्तता तसेच संबंधितांनी त्यांचे ग्रंथालय नोंदवहीत जमा घेऊन दैनंदिन वापरात येत असल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध करुन पुर्तता दर्शवावी.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता होईपावेतो सदरचा खर्च रुपये २,४९,७८८/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आह.

१४ समाजकल्याण
१३% वन अनुदान
७% महसुल अनुदान
जिल्हा निधी खर्च
आक्षेपाधिन रक्कम रुपये २,४९,७८८/-

(पहा विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ५)

---

## स्थानिक क्षेत्र

## मुबंई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( क) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- कर्ज वसूलीबाबत.**

जिल्हा परिषद, समाजकल्याण विभागाने पंचायत समित्यांमार्फत सन १९६२ – ६३ पासून उद्योगधंदे, शेती औजारे, जमिन सुधारणा, ऑईल इंजिन, बागायत, विहीर, दुधदुभते, घर दुरुस्ती इत्यादींकरीता वैयक्तिक लाभार्थ्यांना कर्ज वाटप केलेले आहे. दिनांक ३१.३.२००८ अखेर रुपये ८,२२,८०६/- इतकी कर्जाची थकबाकी असलयाचे कर्ज नोंदवहीवरुन दिसून येते.

याबाबत प्रतिवर्षी लेखापरीक्षण अहवालात (सन १९९८ – १९९९ ते २००५ – २००६) आक्षेप नोंदविण्यात येतो. तसेच सन २००६ – २००७ चे लेखापरीक्षण अहवालात देखील आक्षेप क्रमांक १७ नोंदविण्यात आलेला आहे.

वित्त विभाग परिपत्रक क्रमांक १०९५/प्र.क्र.११२/९५ दिनांक १३.७.१९९५ अन्वये विभाग प्रमुख यांनी कर्जवसुलीसाठी काही एक प्रयत्न केल्याचे दिसून आले नाही. कर्जवसूली न करणेबाबत उदासिनता दिसून येते.

योजनानिहाय व गटनिहाय कर्ज वसूलीचा तपशील अहवालासोबत विवरणपत्र क्रमांक २ मध्ये नमुद केला आहे.

कर्ज वसूलीबाबात योग्य ती कार्यवाही करुन वसूली करुन पुर्तता दर्शवावी.

---

## स्थानिक क्षेत्र

## मुबंई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ड ) खालील अनियमितता.

---

## निरंक

---

## शासकीय क्षेत्र

## मुबंई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( अ ) खालील अनियमितता.

---

### परिच्छेद क्रमांक १० :- सुधारित प्राप्त तरतुदीपेक्षा कमी / जास्त खर्चाबाबत.

समाजकल्याण विभागाने प्राप्त अनुदान व त्याअनुषंगाने केलेला खर्च यांबाबतचा ताळमेळ मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील लेख्याशी घेऊन या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्र क्र. १ मध्ये योजनानिहाय कमी / जादा खर्च बाबतचा तपशिल नमुद करण्यात आलेला आहे.

| अ. क्र | योजनेचे नाव व संकेतांक क्रमांक | सुधारीत तरतुद | प्राप्त अनुदान सन ०७-०८ | जि.प.ने केलेला खर्च सन ०७-०८ | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आस्थापना २२२२५ रोख अनुदान | १९८५५०० | १९८५५०० | २०२७५५२ | ० | ४२०५२ |
| २ | योजनांतर्गत २२२५ रोख अनुदान | ११२०००० | ११२००००० | १२१०९९०० | ९०१०० | ० |
| ३ | अर्थोपाय सप्रयोजन २२२५ अनुदान | ३४७५१००० | ३४७५१००० | ३३८०२०९६ | ९४८९०४ | ० |
| ४ | मा.शा.मा. विद्या.शिक्षण फी / परिक्षा फी २२२५ | १५०००० | ० | १४९९४० | ० | १४९९४० |
| ५ | मा.शा.मा.वि.शिष्यवृत्ती २२२५ | १००००० | ३४५०० | १००००० | ० | ६४५०० |
| ६ | योजनांतर्गत (अर्थोपाय अग्रीमाशी समायोजन) २२२५ | ७८०८४००० | ७८०८४००० | ७७६२९६६८ | ४५४१३२ | ० |
| ७ | योजनांतर्गत (अर्थोपाय अग्रीमाशी समायोजन) २२२५ (भ.वि.जा.ग.) | १३०४३००० | २५४८१५ | १२५९६६३५ | ० | १२३४१८२० |
| ८ | टी.एस.पी.योजनांतर्गत अनुदान २२२५ | १५००००० | ० | १४९९९२० | ० | १४९९९२० |
| ९ | सामाजिक सुरक्षा व अपंग अनुदान २२३५ | २२६३५७७ | २६६३५७७ | २६६६२१७ | ० | २६४० |
| १० | सप्रयोजन रोख अनुदान | ३६१७३००० | ३६१७३००० | ३६०८०४२४ | ९२५७६ | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २२३५ | | | | | |
| ११ | शारिरीकदृष्टया अपंग विद्यार्थ्यांना मार्गदर्शन २२३५ | ३९२७७४ | ३९२७७४ | ४४५०६२ | ० | ५२२८८ |
| १२ | योजनांतर्गत योजना (प्लॅन) २२३५ | १४१५००० | १४१५००० | १२७८९७० | ३४०३० | ० |
| १३ | गृहनिर्माण २२१६ | १४००० | १४००० | १३३५५ | ६४५ | ० |
| १४ | अपंग कल्याण हस्तांतरीत योजना (२२३५) | ३२०००० | ३२०००० | ३१९१६५ | ८३५ | ० |

त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत:

१)जिल्हा परिषदेस २२२५ माध्यमिक शाळेतील मागास वर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फि/परिक्षा फि यासाठी केवळ रुपये १,४९,९४०/- प्राप्त असतांना व टी.एस.पी. योजनांतर्गत माध्यमिक शाळेतील मागास वर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी/परिक्षा फी लेखाशिर्ष २२२५ अंतर्गत जिल्हा परिषदेस अनुदान प्राप्त नसतांना जिल्हा परिषदेने रु. १४,९९,९२०/- खर्च केलेला आहे. एकूण रुपये १६,४९,८६०/- शासनाकडुन अनुदान प्राप्त नसतांना केलेल्या अतिरिक्त खर्चासंदर्भात संबंधीत सक्षम अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी व शासनाचे क्षमापन घेवून व अनुदान प्राप्त करुन अनुपालन करावे.

२)जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाने खालील लेखाशिर्षाखाली कमी खर्च केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| अ | २२२५ रोख अनुदान, अनु. जाती जमाती, इ.मा.चे कल्याणासाठी खर्च | १४,९३,१४० |
| ब | २२१६ गृहनिर्माण | ६४५ |
| क | २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण | १,२७,४४१ |
| | **एकूण** | **१६,२१,२२६** |

सन ०७-०८ चे जि.प.ने केलेले खर्चाचे मुळ व सुधारीत अंदाजपत्रक या बाबींच्या अनुषंगाने मंजूर अनुदान खर्च करण्याची जिल्हा परिषदेची जबाबदारी असून जिल्हा परिषदेने प्राप्त अनुदान पूर्व खर्च न करण्यामध्ये संबंधितांना कर्तव्यात कसूर केल्याचे स्पष्ट होते. अखर्चीत अनुदानाची रक्कम रु. १६,२१,२२६/- ही ग्राम विकास विभाग परिपत्रक क्रमांक पंरास. १०८९/प्र.क्रं.दिनांक २०.१०.१९८९ अन्वये अनुदान निर्धारणाची वाट न पाहता अखर्चीत रक्कम ज्या त्या लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही केलेली नाही. या अनियमिततांबाबत संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करुन अनुपालन दर्शवावे.

३) प्राप्त अनुदानापेक्षा केलेला जादा खर्च :-

| | | |
|---|---|---|
| अ | २२२५ अनु.जाती/जमाती/इ.मा.चे कल्याणासाठी रोख अनुदान | १,२४,४८,३७२ |
| ब | २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण | ५४,९२८ |
| | एकूण | १,२५,०३,३०० |

अंतर्गत व सुधारीत प्राप्त अनुदानाचे मर्यादित खर्च करण्याची जबाबदारी जि.प. ची आहे. परंतु सन २००७-०८ या वित्तीय वर्षात रु. १,४१,५३,१६०/- एवढा खर्च प्राप्त अनुदानापेक्षा जास्त केलेला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम १९६१ चे कलम १४० प्रमाणे अर्थसंकल्पीय तरतूदीपेक्षा जादा खर्च करता येत नाही असे स्पष्ट नमूद असतांना नियमांचे पालन न करता नियमांचे उल्लंघन करुन केलेला खर्च नियमबाहय आहे. याबाबत संबंधित विभागप्रमुख व अर्थविभाग हे प्रामुख्याने जबाबदार आहेत. या संबंधीतांवर जबाबदारी निश्चित व्हावी व जादा खर्चापोटी अनुदानाची रक्कम शासनाकडून प्राप्त करुन घ्यावी. तसेच सदर अनियमिततेस शासनाचे क्षमापन घेवून अनुपालन दर्शवावे.

जिल्हा परिषद नाशिक
समाजकल्याण विभाग

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- वन अनुदानाचे विनियोगाबाबत**

शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रं. १०९४/३३७/प्र.क्रं. २५२२/२४ दिनांक ३० एप्रिल १९९४ अन्वये १३ वने (७ टक्के अनुदान) या लेखाशिर्षाखाली प्राप्त झालेले अनुदान वनीकरण व वनसंवर्धनाच्या योजनेवर प्राधान्य क्रमाने खर्च करावे असे निर्देश दिलेले असतांना, वनक्षेत्र विभागातील ग्रामपंचायत हद्दीलगतच्या रस्त्यावर सौर दिपचा १०० टक्के अनुदानावर रुपये ७,४९,२५०/- एवढा खर्च केला आहे.

ज्या उद्देशाने अनुदान प्राप्त झाले आहे. त्या उद्देशाकरीता अनुदान खर्च केलेला नसल्याने याबाबत शासनाचे क्षमापन घेवून पूर्तता करावी. तापर्यंत खर्चाची रक्कम रु. ७,४९,२५०/- शासन अनुदानासाठी कायम अमान्य करण्यात येत आहे.

१३ वने
कायम अमान्य रक्कम रु. ७,४९,२५०/-

(पहा विवरणपत्र ४(अ) चा अ.क्रं. १)

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- वृध्द कलाकार मानधन वाटपाबाबत.**

वृध्दकलाकार मानधन वाटपाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र शासन समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य-क्रिडा विभागाकडील परीपत्रक क्रं. एम.एस.१०९१/५५२२७/प्र.क्रं.४४६/सक/२/दि. २८.६.१९९२ नुसार सदर योजनेत दर सहा महिन्यांनी मानधनाची रक्कम संबंधीतांना अदा करण्यापुर्वी हयातीचा दाखला घेणे आवश्यक आहे. असे असतांना संबंधीत वृध्द कालाकरांची हयातीचे दाखले प्राप्त न करताच मानधनाची रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील परीशिष्ट क्रं. ४ नियम क्रं. ७२ व नियम क्रं. ७४ नुसार स्थानिक स्तरावरील शाळेचे मुख्याध्यापक, पोस्ट

मास्तर, राजपत्रीत अधिकारी व शासन नियुक्त विशेष दंडाधिकारी यापैकी एका अधिका-याने प्रमाणीत केलेले हयातीचे दाखले प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त नमुद आक्षेप संबंधीत तालुकानिहाय खर्चाचा तपशिल खाली नमुद करण्यांत येत आहे.

अ) **तालुका निफाड**

एकुण ७४ वृध्द कलाकारांना मानधनाची रक्कम रु. ३,८७,०००/- प्रदान.

ब) **पंचायत समिती दिंडोरी**

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | १.९.२००७ | १८,००० |
| २९ | १.९.२००७ | ३,००० |
| २० | ३.११.२००७ | ७,००० |
| १२९ | २५.३.२००८ | १४,००० |
| १३० | २५.३.२००८ | ६,००० |
| ३१३ | ३१.३.२००८ | ६,००० |
| | **एकूण** | **५४,०००** |

**क) पंचायत समिती सुरगाणा :-**

प्रमाणक क्रमांक १९५ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रक्कम रुपये १८,०००/- एकूण ३ कलाकारांना अदा.

वरीलप्रमाणे अदा रक्कम शासकीय अनुदानासाठी तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
१४ समाजकल्याण
२२२३ वृध्द कलाकार मानधन अभिकरण योजना
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ४,५९,०००/-

(पहा विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ.क्र. १ पहा)

**परिच्छेद क्रमांक १३ :- दलित वस्ती सुधारणा योजनेवरील खर्चाबाबत.**

शासनाकडून दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्हा परिषद नाशिक यांना रुपये ६,०४,५७,०००/- एवढे अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त अनुदानातून एकूण ४२७ ग्रामपंचायतींना रुपये २,७४,३८,२९०/- (पहिला हप्ता २,७२,२२,८२५/- = ५,,४६,६१,११५/- + ०६-०७ रुपये ५७,९५,८४५/-) एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. एकूण २५० ग्रामपंचायतींना अनुदान वितरीत केलेले आहे.

या अनुदान वितरणसंदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१) पंचायत समिती स्तरावरुन वाटप करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम ग्रामपंायतीने स्वतंत्र खाते बँकेत उघडवून व रक्कम जमा केल्याचे ग्रामपंचायत व खातेनिहाय विवरण दर्शवावे.

२) परिपत्रक क्र. दवसु/कासमे/कालावधी/वाड्म/२००१/का-१२/२४७/संचालनालय स.क.पुणे दिनांक २०.४.२००१ अन्वये सदरची कामे एक वर्षाचे आत पूर्ण करणे बंधनकारक आहे. सन २००७-०८ या वर्षाअखेर या अहवालासोबतच्या परिशिष्ट क्रमांक १ मध्ये नमुद केलेली वर्षनिहाय नमुद केल्याप्रमाणे १८० कामे अपूर्ण आहेत. शासन परिपत्रकातील अटी शर्तीचे पालन न झाल्याने शासनाचे क्षमापन घेवून अनुपालन दर्शवावे.
३) शासन आदेश क्र.झेडपी/२०००/प्र.क्र.१८/२३/मुंबई दिनांक १९.१.२००१ अन्वये ग्रामनिधीत ५% रक्कम ग्रामनिधीत जमा केल्याची रोजकिर्द व बँक पास बुक उपलब्ध करुन पुर्तता दर्शवावी.
४) सदरचे अनुदान ग्रामपंचायतीस देण्यात आलेले आहे त्यांनी सदर दलित वस्तीतील कामे ही मक्तेदारांमार्फत केली असल्यास शासन परिपत्रक क्र. विकअप्र/क्र.४३/कराधान-१ दिनांक ५.५.१९९९ नुसार मक्तेदारास प्रदान केलेल्या रक्कमेच्या एकंदर कामाच्या ४% प्रमाणे कार्यकंत्राटाची रक्कम वसूल करुन शासनाकडे भरणा करुन पुर्तता दर्शवावी.
५) शासन निर्णय, समाजकल्याण क्रमांक दवसु/२०००-२००१/सोला/का-१२/११७६ पुणे दिनांक ४.१२.२००० मधील अट क्रमांक ९,१०,११ नुसार ६ महिन्याच्या आत काम पूर्ण करणे बंधनकारक आहे. जी कामे ६ महिन्याचे आत आदेशाचे दिनांकापासून ज्या ग्रामपंचायतींनी पूर्ण कली नसतील अशा ग्रामपंचायतींकडून प्रदान केलेल्या अनुदानाची पूर्ण रक्कम वसूल करुन अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त अनियमिततांची पूर्तता होईपावेतो खर्च रुपये २,७४,३८,२९०/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

द व सु
१४ समाजकल्याण
शासकीय अनुदान
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये २,७४,३८,२९०/-

(विवरणपत्र क्र. ४(ब) चा अ.क्र. २ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- गौण खनिज रक्कम वसूल न करणेबाबत.**

दलित वस्ती सुधार योजना अनुदानातून सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद, समाजकल्याण विभागाने ग्रामपंचायींना एकूण ४२७ कामांसाठी रुपये ५,४६,६१,११५/- एवढे अनुदान वितरीत केले आहे. ४२७ कामांपैकी २४९ कामांना तीन हप्ते देण्यात आलेले आहेत. यांपैकी रस्त्यांची कामे प्रामुख्याने पूर्ण करण्यात आलेली आहेत सदरच्या कामांत वापरण्यत आलेल्या गौण खनिजांची रक्कम देयकात व मोजमाप पुस्तिकेच्या बिलात नमुद आहे. या अहवालासेबत जोडण्यात आलेल्या गौण खनिजाची नमुद १५१ कामांत वपरण्यात आलेल्य गौण खनिजाची काढण्यात आलेली रक्कम रुपये ५,८२,७८४/- संबंधित ग्रामपंचायतींकडून वसूल अथवा कपात करुन शासन सदरी भरण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. गौ.ख.नि./१०/०२०६/प्र.क्र.२०६/प्र.क्र.५७/ख मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक १५.१२.२००६ नुार गौण खनिजावरील स्वामित्व धनाची दर प्रति घनमिटरला रुपये ३५.३४ नमुद करण्यात आलेले आहेत. त्या नुसार दलित वस्ती सुधार योजना अनुदानातून रस्त्याने व इतर कामासाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रक्कम संबंधित ग्रामपंचायतीकडून वसूल करुन शासनाकडे भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

१४ समाजकल्याण
दलित वस्ती अनुदान
अंतिम अमान्य रक्कम रुपये ५,८२,७८४/-

(पहा विवरणपत्र क्रमांक ४(अ) चा अ.क्र. २)

---

## **शासकीय क्षेत्र**

## **मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खालील अनियमितता.**

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- रस्ता कॉक्रीटीकरण करणे.**

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | ग्रामपंचायत नवसारी, ता. नांदगाव दलित वस्तीतील रस्ता कॉक्रीटीकरणे करणे. |
| २ | प्रशासकीय मान्यता | जा.क्र.जिपना/स.क./दवस/६९/२००७/०८ नाशिक दिनांक १४.१.२००८ |
| ३ | तांत्रिक मान्यता | ता.मा.क्र.९९३ दिनांक ३०.११.२००७ रुपये २,००,०००/- |
| ४ | अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये) | २,००,०००/- |
| ५ | लेखाशीर्ष | १४ समाजकल्याण दलित वस्ती अनुदान |
| ६ | निविदा/दरपत्रक प्रकार | - |
| ७ | जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक) | - |
| ८ | मक्तेदाराचे नाव व स्विकृत निविदा दर | ग्रामपंचायत नवसारी, ता. नांदगाव, जि. नाशिक |
| ९ | कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | १५.५.२००८ |
| १० | कामाची मुदत | - |
| ११ | मुदतवाढ दिनांक | - |
| १२ | काम पूर्ण दिनांक | १३.६.२००८ |
| १३ | मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्र. | - |
| १४ | कामावर झालेला एकूण खर्च (रुपये) | रु. १,९५,३२३/- |
| १५ | अंतिम प्रमाणक क्र., दि. व रक्कम रु. | - |

| | | |
|---|---|---|
| १६ | इतर तपशील | - |

उपरोक्त खर्चाचे बाबतीत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

वरील कामासाठी ग्रामपंचायतीने खालीलप्रमाणे गौण खनिजाचा वापर केलेला आहे.

| बाब | परिमाण | वाळू | प्रमाण | अनुज्ञेय गौण खनिज प्रमाण |
|---|---|---|---|---|
| दगड | १०८.९० | - | १.२५ | १३६.१२ |

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्र. गौखनि १०/०२०६/ प्र.क्र.५७/ख मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक १५.१२.२००६ अन्वये गौण खनिजावरील स्वामित्व धनाची रक्कम प्रति घ.मी. ३५.३४ प्रमाणे वसूल करुन महसूल खाती भरणा करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी गौण खनिजाची रक्कम प्रति घ.मी. ला रुपये ३५.३४ प्रमाणे १३६.१२ घ.मी. साठी रक्कम रुपये ४,८१०/- महसूल विभागाकडे शासनाकडे भरणा केलेली नाही. ग्रामपंचायतीने सदरची रक्कम शासनाकडे भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

पंचायतीने रस्त्याचे कामासाठी सिमेंटचा वापर केलेला आहे. मोजमाप पुस्तिकेत सिमेंट गोणी वापरल्याचा तपशील व सिमेंट गोणी फरकाचे बिल तयार करुन रक्कम नमुद तपशील खालीलप्रमाणे –

| **बाब क्र.** | **तपशील** | **परिमाण** | **अनुज्ञेय सिमेंट परिमाण** | **प्रत्यक्षात सिमेंट विगतवारी** |
|---|---|---|---|---|
| १ | सीसी १:५:१० | ६२.१८ | २.६० | ६१.६७ |
| २ | सीसी १:२:४ | ४९.५९ | ६.१० | ०२.६७ |
| | | | | ६४.१७ |

सिमेंट फरकासाठी नमुद गोणी संख्या ४६ फक्त

प्रति गोणी फरक रुपये ५० X गोणी संख्या ४६ = रुपये २३,२००/- (नमुद आहे)

या ठिकाणी ४६ गोणींसाठी प्रति गोणी रुपये ५० प्रमाणे रुपये २,३००/- अनुज्ञेय

जादा रुपये २०,९००/-

चुकीचा गुणाकार केल्यामुळे शेवटी एक शून्य वाढल्यामुळे ग्रामपंचायतीस रुपये २०,९००/- चे जादा प्रदान झालेले आहे. सदरची रक्कम जबाबदारी निश्चित करुन वसूल करुन १४ समाजकल्याण शासकीय निधी खाती भरणा करावी व अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष

१४ समाजकल्याण

गौण खनिज वसूली

अंतिम अमान्य व वसूलपात्र रक्कम रुपये ४,८१०/-

सिमेंट फरक जादा प्रदान रक्कम रुपये २०,९००/-

(पहा विवरणपत्र क्रमांक ४(अ) चा अ.क्र. ३)
(पहा विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ६)

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- सौर दिप अनुदान प्राप्त करुन घेणेबाबत.**

दलित वस्ती सुधार योजना अनुदानातून ग्रामपंचायत उभाडे ता. इगतपुरी यांना समाजकल्याण विभागाने दोन पथदिप व स्ट्रीट लाईट खरेदी करुन बसविणेसाठी रु. ५७,९०६/- एवढे अनुदान अदा केले आहे.

उभाडे ग्रामपंचायतीने पंचायत समिती इगतपुरी मार्फत महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकरण, पश्चिम घाट विकास कार्यक्रम अंतर्गत आस्थापित सौर दिपाचे अनुदान रु.९,६००/- चा प्रस्ताव पाठविलेला आहे. परंतु लेखापरीक्षण कालावधी पूर्ण होईपावेतो सदरचे अनुदान जिल्हा परिषदेस प्राप्त झालेले नाही.

अनुदान प्राप्त का झाले नाही, याबाबत माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेस अनुदानापासून वंचित रहावे लागणार आहे. याबाबत अनुदानाचा प्रस्ताव सादर करण्यात प्रशासनाकडून चुक झाली असल्यास जबाबदारी निश्चित करावी व अनुदानाची रक्कम वसूल अथवा अनुदान प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

१४ समाजकल्याण
सौर उर्जा (पथदिप)
दलित वस्ती सुधारणा योजना अनुदान
अप्राप्त अनुदान रक्कम रुपये ९,६००/-

(पहा विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ७)

---

## शासकीय क्षेत्र

## मुबंई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( क ) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक १७ :- दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत अपूर्ण कामांबाबत.**

या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्र क्रमांक ७ मधील दलित वस्ती सुधार योजनांतर्गत सन १९९७ – १९९८ ते २००७ – २००८ मधील मंजूर कामांचा व वितरीत अनुदानाच्या तपशिलांनुसार खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

१) सन १९९७ – १९९८ ते २००७ – २००८ या कालावधीत एकूण २७९ कामे मंजूर करण्यात आले असून त्यांपैकी २५२ कामे दिनांक ३१.३.२००८ अखेर पूर्ण झाली असून ९ कामे रद्द करण्यात आली आहेत. सोबतच्या जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे १८ कामे अपूर्ण आहेत.

उपरोक्त रद्द केलेल्या ९ कामांपैकी २ कामाचीं रक्कम शासनास परत करण्यात आली असून उर्वरित ७ कामांसाठी वाटप केलेली पहिल्या हप्त्याची रक्कम रुपये १,६२,४८०/- अद्यापही संबंधित ग्रामपंचायतींकडून वसूल झालेली नाही. त्यांपैकी मोठी रक्कम सन १९९९ – २००० पासून अखर्चित राहिलेली आहे. सदर रक्कम वसूलीबाबत ठोस कार्यवाही करुन रक्कम वसूल करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

तसेच एकूण १८ अपूर्ण कामांसाठी दि. ३१.३.२००८ अखेर रुपये ११,९९,३५०/- इतकी रक्कम संबंधित ग्रामपंचायतींना अदा करण्यात आली आहे. सदरचे अपूर्ण कामांपैकी एकूण १५ कामे ही सन १९९८ – १९९९ ते २००६ – २००७ कालावधीचे आहेत. याबाबत संबंधित ग्रामपंचायतींकडून सदरची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करवून पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

२२२५ समाजकल्याण<br>
द व सु अनुदान<br>
अंतिम अमान्य रक्कम रुपये १,६२,४८०/-<br>
पंचायत समिती बागलाण

(पहा विवरणपत्र क्रमांक ४(अ) चा अ.क्र. ४ पहा)

---

## शासकीय क्षेत्र

## मुबंई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक १८ :- अपूर्ण बांधकामांबाबत.**

जिल्हा परिषद, समाजकल्याण विभागाकडून शासनाकडून प्राप्त अनुदानातून प्रति वर्षी ग्रामपंचायत स्तरावर रस्ते, समाजमंदिर, पाणी पुरवठा इत्यादि कामांना अनुदान वितरीत करण्यात येते.

शासन परिपत्रक क्रमांक दवसु/कासये/कालावधी वाझ/२००१/का-१२/२४७/ संचालनालय/स.क. पुणे दिनांक २०.४.२००१ अन्वये दलित वस्ती अनुदानातील कामे अनुदान प्रदान वित्तीय वर्षातच पूर्ण केली पाहिजेत; परंतु ग्रामपंचायतीने विहीत मुदतीत कामे पूर्ण केली नसल्याने अनुदानाचा वाटपाचा हेतू शासनाचा सफल झालेला नाही.

या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक २ मध्ये नमुद केलेल्या यादीनुसार सन १९९७ – १९९८ ते २००६ – २००७ अखेर एकूण १८३ कामे अपूर्ण असून त्यांमध्ये रक्कम रुपये ६४,४४,७२०/- एवढा शासन निधी अडकवून पडलेला आहे.

वेळीच कामे पूर्ण न झाल्याने वर नमुद केलेला निधी व्यर्थ जाणार आहे. कामे पूर्ण करण्यास संबंधित ग्रामपंचायती सक्षम नसतील अथवा त्यांनी प्राप्त रक्कमेचा योग्य विनियोग केला नसल्यास याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन उचित प्रशासकीय कारवाई व्हावी तसेच कामे पूर्ण करुन अनुपालन दर्शवावे.

१४ समाजकल्याण
जिल्हा परिषद, नाशिक

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- ग्रामपंचायत स्तरावरील अपूर्ण कामांबाबत.**

दलित वस्ती सुधार योजनांतर्गत इगतपुरी तालुक्यातील एकूण १३ ग्रामपंचायतींना मागासवर्गीय वस्तीत वेगवेगळ्या विकास कामांसाठी अनुदान प्राप्त झाले आहे. या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सन १९९७ – १९९८ ते २००७ – २००८ या कालावधीत सुरु केलेली कामे संबंधित ग्रामपंचायतींनी वेळीच पूर्ण केली नाहीत. या अहवालासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र. १,९,१० व १२ अशी एकूण ४ कामे सुरु नसलेबाबत शेरा या रकान्यात नमुद केले आहे. त्यात शासनाची रुपये २,२९,२००/- एवढी रक्कम ग्रामपंचायीकडे विनावापर पडून आहे. सदरची रक्कम ग्रामपंचायत खर्च करीत नसल्यास अथवा तांत्रिक अडचणी असल्यास तात्काळ गटविकास अधिकारी पंचायत समिती इगतपुरी यांनी ओदश काढून व रक्कम ग्रामपंचायतीकडून प्राप्त करुन शासकीय सदरी भरणा करावी.

ग्रामपंचायीने सदरचा निधी अन्य ठिकाणी वापरात आणून दुरुपयोग केला असल्यास याबाबत चौकशी करावी व संबंधितांकडून व्याजासह रक्कम वसूल करावी.

जिल्हा परिषद, समाजकल्याण विभागाने नवीन अनुदान वितरीत करणे अगोदर जुनी कामे पूर्ण करण्यासाठी ठोस उपाय – योजना करावी. सदरची कामे वेळीच पूर्ण न झाल्याने योजनेचा फायदा ग्रामीण भागातील जनेतेला झालेला नाही. तसेच अपूर्ण अवस्थेतील कामे काळाच्या ओघात अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती इत्यादि बाबींमुळे निकृष्ठ तसेच पाण्याच्या प्रवाहात वाहून जाण्याची शक्यता असल्याने त्यातच इगतपुरी तालुक्यात अतिवृष्टी होत असलयाने शासनाचा निधी व्यर्थ जाण्याने शासनाचे आर्थिक नुकसान होऊ शकते.

अनुदानाचा योग्य व वेळीच विनियोग होतो किंवा नाही याबाबत पंचायत समिती स्तरावरील सक्षम अधिकारी यांची जबाबदारी असून ते आपली जबाबदारी पार पाडीत नसल्याचे दिसून येते.

परिशिष्टातील अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करुन अनुपालन दर्शवावे.

१४ समाजकल्याण
दलित वस्ती सुधार योजना अनुदान
पंचायत समिती इगतपुरी

---

**परिच्छेद क्रमांक २० :- दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत अपूर्ण कामांबाबत.**

पंचायत समिती येवला यांचेकडील दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत समाजकल्याण विभागाकडून प्राप्त अनुदानातून या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ठ क्रमांक ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सन २००७ – २००८ अखेरपर्यंत एकूण १४ कामे अपूर्ण असून त्यात रुपये १३,५५,९६०/- इतके अनुदान संबंधित ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आलेले आहे.

सदर अपूर्ण कामांपैकी अनुक्रम क्रमांक १,२,७ व १० अशी एकूण ४ अपूर्ण कामांसाठी एकूण रुपये ३,२८,०००/- इतके अनुदान वितरीत करुनही विहीत कालावधीत पूर्ण करण्यात आलेली नाहीत. अवाजवी विलंबामुळे सदर कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या मर्यादेत काम पूर्ण होणे शक्य होणार नसल्याची शक्यता नाकारता येणार नाही व त्यामुळे वितरीत केलेले अनुदान व्यर्थ जाऊन शासनाचा उद्देश सफल होऊ शकणार नाही.

तरी सदरची अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत ठोस कार्यवाही करावी. कामे पूर्ण होणे शक्य नसल्यास झालेल्या खर्चाबाबत संबंधित ग्रामपंचायतींची जबाबदारी निश्चित करुन व्याजासह वसूली करुन पूर्तता दर्शवावी.

पंचायत समिती येवला
समाजकल्याण

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- जडसंग्रह नोंदवही नमुना नंबर ३२ प्रमाणपत्र नोंदीबाबत.**

सन २००७ – २००८ मधील जिल्हा परिषद नाशिकचे समाजकल्याण विभागांकडील लेखापरीक्षण केले असता जडसंग्रह नोंदवही नमुना नंबर ३२ मधील दिनांक ३०.६.२००७ अखेर पृष्ठ क्रमांक ८४ वर प्रमाणपत्र नोंदविलेले असून जिल्हा समाजकल्याण (गेड अे), जिल्हा परिषद, नाशिक यांनी प्रमाणित करुन स्वाक्षरी केलेली नाही. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना पत्राद्वारे दाखला कळविलेला नाही. याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- लेखा स्थिती**

समाज कल्याण विभागाची लेखा स्थिती सर्वसाधारण बरी आढळून आली. तथापी सन १९६२-६३ ते २००६-२००७ अखेर एकूण ४९० इतके आक्षेप प्रलबिंत आहेत. आक्षेपांचे पुर्ततेबाबत पाठपुरावा करणेत येऊन पुर्तता करणेत यावी. तसेच जिल्हा परिषदेच्या अंतर्गत तपासणी पथकाकडून या बाबीकडे विषेश लक्ष देऊन आक्षेपांची पुर्तता लवकरात लवकर होण्याचे दृष्टीने कार्यवाही करावी.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- विवरण पत्रे**

या अहवालासोबत आवश्यक ती सर्व लेखा विवरणपत्रे जोडणेत आलेली आहेत. विवरणपत्र क्र १ जमा व खर्चाचे विवरण अर्थ विभागाशी पडताळणी करुन मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे स्वाक्षरीने सादर केलेले असून ती अचूक असल्याचे ताळमेळाअंती प्रमाणित करावे.

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- आक्षेप विवरणपत्र**

लेखापरिक्षणात आढळून आलेल्या संकिर्ण आक्षेपांची पुर्तता लेखापरिक्षण सुरु असतांना केल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमित करण्यात आलेले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- अनुपालन व पोहच**

मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० चे कलम १०(१) अन्वये या लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेदांवरील अनुपालन, प्रस्तुत अहवाल प्राप्त झाले पासुन चार महिन्याच्या आत, जिल्हा परिषदेच्या ठरावासह व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने तीन प्रतीत या कार्यालयाकडे पाठविणेत यावे. तसेच हा अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवुन पोहोच देणेत यावी.

उपमुख्य लेखा परिक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक.

**प्रत :- सविनय सादर.**

१. मा. सचिव ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. (पत्राने)
२. मा. सचिव, समाज कल्याण, सांस्कृतिक क्रिडा व पर्यटन व जनजाती विभाग, मुंबई.
३. मा. महालेखापाल, बाहय लेखा परिक्षण विभाग, मुंबई.
४. मा. संचालक, समाज कल्याण, संचालनालय, पुणे.
५. मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
६. मा. मुख्य लेख परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
७. मा. सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक
८. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.

**<u>प्रत:- सस्नेह अग्रेषित</u>**

१. मा. विभागीय समाज कल्याण अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक.
२. मा. उपमुख्य लेखा परिक्षक (पंरास), स्थानिक निधी लेखा, मुंबई.
३. मा. समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक.